प्रकरण चौथे

# उपसंहार

## प्रस्तावना

रंगराव बापू पाटील या लेखकांच्या काही कादंबऱ्या आणि कथासंग्रह माझ्या वाचनात आले. आणि त्या लेखकाचे सारे साहित्य वाचावे अशी उत्कटता मनामध्ये निर्माण झाली. सारे साहित्य वाचल्यानंतर असेही वाटू लागले की, इतके सकस लिहणारा लेखक प्रसिद्धीच्या झोतात कसा काय नाही? या औत्सुक्यापोटीच मी लेखक कसा आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी लेखकाला भेटून त्यांची मुलाखत घेतली आणि त्यातून माझ्या असे लक्षात आले की, सात कादंबऱ्या आणि पाच कथासंग्रह यांची मोलाची भर मराठी साहित्यात घालणारा हा लेखक अत्यंत अबोल आणि प्रसिद्ध पराड.मुख आहे.

त्यांच्या 'ल्हावर' कथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचे उत्कृष्ट कथासाहित्य निर्मितीचे १९८० व १९९३ सालचे पारितोषिक मिळाल्याचे बघून तर मला आणखी आश्चर्य वाटले लेखकाविषयीची अधिक माहिती इतरत्र मिळवली असता असे लक्षात आले की, हा लेखक स्वत:च्या मनामध्येच रंगलेला असतो. आपल्या परिसराशी, निसर्गाशी मनातल्या माणसांशी त्यांच्या सतत वाद आणि संवाद चाललेला असतो. आणि त्यातून त्यांच्या वाङ्मयाची निर्मिती होत असते. एरवी फारशे कोणात न मिसळणे प्रसिद्धीचे झगमगाट टाळणे, कुठल्याही साहित्यिक, गटात न सहभागी होणे आणि प्रसिद्धीसाठी कसलिही खटपट न करणे हा त्यांचा स्थायी भाव दिसला आणि म्हणूनच मला या लेखकाच्या साहित्याचा अभ्यास करणे अधिक गरजेचे वाटू लागले. तो अभ्यास मी दोन कथासंग्रहाच्या आधारे केलेला आहे. ते कथासंग्रह म्हणजे 'ल्हावर' व 'भोवरा' होत.

हा अभ्यास करण्यापाठीमागे आणखी एक दृष्टिकोन आहे तो म्हणजे रंगराव पाटील यांच्या साहित्यात जो परिसर येतो तो सांगली–कोल्हापूर जिल्हाच्या सीमारेषेमधील म्हणजे शिवाजी विद्यापाठाच्या कक्षेतला तेव्हा या विद्यापीठात एम्. फील. करत असताना या विद्यापीठाच्या परिसरातील एका सकसपण प्रसिद्धी पराङ्मुख व्यक्तीचा अभ्यास करुन त्यांच्या लेखननाचा चिकित्सक अभ्यास करणे हाही एक हेतू या लेखनामागे आहे.

असे हेतू डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या 'ल्हावर' व 'भोवरा' कथासंग्रहाच्या आधारे त्यांच्या कथाविश्वातील जाणिवा व उणीवांच्या मागोवा घेण्याचा प्रयत्न मी माझ्यापरीने केलेला आहे. त्यासाठी अभ्यासाची रुपरेषा आखून या दोन कथासंग्रहाचा सर्वांगीण विचार मी केलेला आहे. त्याचा सारांश या पद्धतीचा आहे.

प्रकरण एक मध्ये कथा साहित्याचा विचार केलेला आहे. त्यामध्ये कथेची परंपरा सांगितलेली आहे. मराठी साहित्य परपंरेमध्ये कथा विषयाच्या तीन अवस्था सांगितलेल्या आहेत. संत, पंत आणि तंत साहित्यामध्ये कथा कशी आलेली आहे याविषयी विवेचन आलेले आहे. त्यामध्ये बापू छत्रे, डॉ. रामजी गणोजी, त्र्य. ना. मंचरकर, वि. स. नवलकर यांच्या साहित्याचे विवेचन केले आहे.

पुढे मराठी कथेतील विविध प्रवाह या विषयी लिहिले आहे. यामध्ये हरिभाऊ आपटे, श्री. म. माटे, ग. ल. ठोकळ यांच्या साहित्याचा आढावा घेतलेला आहे.

१९४६ मध्ये झालेले परिवर्तन आणि त्या कालखंडातील व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, रणजीत देसाई, अण्णाभाऊ साठे, रा. रं. बोराडे. नागनाथ कोतापल्ले, आनंद यादव, श्रीराम गुंदेकर इ. कथाकारांच्या परंपरा सांगितलेली आहे.

यानंतर ग्रामीण साहित्याची व्याख्या सांगितलेली आहे. तसेच ग्रामीण साहित्याची वैशिष्टये सांगितलेली आहेत. त्यामध्ये ग्रामीण साहित्याची भाषा, लोकांच्या रुढीपरंपरेचे चित्रण, समाज जीवनाचे चित्रण, स्त्रीयांच्या भावभावनांचें चित्रण, निसर्गाभिमुखता, समाजभिमुकता इ. वैशिष्टयांचे विवेचन केले आहे.

प्रादेशिक साहित्याविषयी विवेचन करुन प्रादेशिक साहित्य व ग्रामीण साहित्य यामधील फरक स्पष्ट केलेला आहे. त्यानंतर ग्रामीण कथेचा प्रारंभ आणि विकास चर्चा केलेली आहे.

त्यामध्ये हरिभाऊ आपटे, श्री. म. माटे, सुखठाकर, बा. द. सातोसकर, ग. ल. ठोकळ, र. वा. दिवे, वामन चोरघडे, श्री. कवठेकर, य. गो. जोशी, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार, उध्दव शेळके, डॉ. सरोजिनी बाबर, ग. दि. माडगुळकर, शंकरराव खरात, हमीद दलवाई, मधु मंगेश कर्णिक, रा. रँ. बोराडे, आनंद यादव इ. कथाकारांच्या साहित्याचा आढावा घेतलेला आहे. त्या कथाकारांच्या कथामध्ये असलेले कथानक, कथेत येणारे लोकजीवन, भाषा, शेतीजीवन निसर्ग चित्रण, इतर समाज, प्रादेशिकतेचा विचार, ग्रामीण कथांचा आरंभ व विकास इ. विषयीची चर्चा केलेली आहे.

शेवटी रंगराव बापूंचा परिचय दिलेला आहे. त्याचा जीवनपट दिलेला आहे.

प्रकरण दोनमध्ये प्रारंभीच पाटलांचे इतर साहित्य व 'ल्हावर' विषयी लिहिलेले आहे. 'ल्हावर' कथासंग्रहाला मिळालेला राज्य पुरस्कार याविषयी चर्चा केलेली आहे. नंतर 'ल्हावर' कथासंग्रहाचे मुल्यमापन केलेले आहे. 'ल्हावर' मधील कथाही ग्रामीण कथा असल्याचे सांगितले आहे. ग्रामीण कथेतील ग्रामीण प्रदेश, कौटुंबिक प्रश्न, आर्थिक तणाव, ग्रामीण निसर्ग, ग्रामीण जीवनाला साह्ययक जीवन चित्रण, प्रीती, ग्रामीण भाषा इ. विषयांचे विवेचन केलेले आहे.

पुढे मनोविश्लेषणात्मक कथांचा आढावा घेतलेला आहे. त्यामध्ये विविध मनाचा विचार केलेला आहे. त्यामध्ये आईपासून दुरावलेले मन प्रीतीत, गुरफटलेलं मन प्रीतीचा विचार करणारे मन, आठवणीत रमलेले मन, ग्रामीण युवतीचं मन इ. कथांच्या माध्यमातून सविस्तर विचार केलेला आहे.

विषयांची विविधतेमध्ये प्रेमविषयक कथा व्यक्तीवैशिष्टयांनी नटलेल्या कथा भाऊबंदकी व कौटुबिक संघर्षकथा, संमोहन करणाऱ्या कथा, कुटुंबकथा, निसर्गवर्णनपर कथा, भूतकथा, अंधश्रद्धेवर आधारित कथा, प्राणी जीवनाचे चित्रण करणारी कथा, मदतीची भावना व्यक्त करणारी कथा इ. विषयक कथांचे विवेचन केलेले आहे.

स्वभावरेखाटनामध्ये विविध पात्रांचा परिचय स्वभाववैशिष्टयानुसार करुन दिलेला आहे. ही पात्रे त्यांच्या सर्व लकबीसह चितारलेली आहेत. त्यांचा आढावा घेतलेला आहे.

प्रीतीविश्वात रमणाऱ्या पात्रांच्या मध्ये मास्तर जो जोगतीणीवर प्रेम करतो आहे त्याचे चित्रण आले आहे. त्याचबरोबर शानीवर प्रेम करणारा तानाजी आहे. नी बम्र्यावर प्रेम करणारी कुसुम, शेताची राखण करणारी सगुणा, कलाबाई जोगतीण इ. पात्रांचा विचार केलेला आहे.

शेतीजीवनाशी एकनिष्ठ व्यक्तीरेखांच्या मध्ये निवास, सगुणा इ. समावेश होतो. त्यांचा आढावा स्वभाववैशिष्ट्यासह घेतलेला आहे.

अंधश्रद्धेला बळी पडणाऱ्या व्यक्तीरेखांच्यामध्ये मुलाणी, हरिबा उसाणे यांचा समावेश होतो. त्यांचीही स्वभाववैशिष्ट्ये सांगितलेली आहेत.

घाबरट व्यक्तिरेखांच्यामध्ये संभा, भगवान या व्यक्तीचे स्वभावचित्रण सांगितलेले आहे. तसेच उनाड व्यक्ती म्हणून सरशी, गारुडी इ.चा उल्लेचा आलेला आहे.

सूडाच्या भावनेने पेटलेल्या व्यक्तिरेखामध्ये हांबऱ्या याचे स्वभावचित्र सांगितलेले आहे.

स्त्री व्यक्तिरेखांच्यामध्ये बायना व इतर स्त्रीया त्यामध्ये किसामावशी, हांबऱ्याची बायको चांदणी, कलाबाई जोगतीण, शाबी, आनंदी, सरशी, वच्ची, सगुणा इ. स्त्रीयांचा आढावा घेतलेला आहे.

दयाशील आणि वत्सल व्यक्तींच्यामध्ये रहिमान, आबा, सोनाप्पा यांचे विवेचन केलेले आहे. या मुख्य पात्रांच्या व्यतिरिक्त गौणपात्रांचाही त्यांच्या स्वभाव वैशिष्ट्यासह आढावा घेण्यात आलेला आहे.

'ल्हावर' कथासंग्रहामध्ये अनेक गौण पात्रे आली आहेत. त्या गौणपात्रांच्यामध्ये पहिल्यांदा मास्तर जिच्यावर प्रेम करतो होता ती आनंदी आहे. गज्या दाभोळे आहे जो पानपट्टीवाला आहे. धोंड्या न्हावी आहे. वालुबाई जोगतीण आहे. कलाबाई जोगतीण ज्याच्यावर प्रेम करते आहे तो गिरीलाल आहे. इ. आढावा घेतलेला आहे.

तसेच नदाफ पोलीस, फौजदार दीक्षित, पोलीस शहाजी सर्जु शिवाजी, आण्णाप्पा, तात्या पारुमामी, खेडकरांची आऊ इ. पात्रांचा उल्लेखही केलेला आहे. तसेच मळा विकत घेणारा लाटणे भगवानचा मित्र इकबाल्या, अर्धल्या, पक्याचा मित्र फोंद्या शिंद्याची शानी जिच्यावर तानाजी प्रेम करतो आहे. कपडे धुण्याला गेलेली सुली, शाबीचा भाऊ आंद्या, लाटण्याचा बाळूशा इ. पात्रांचा त्यांच्या वैशिष्ट्यासह आढावा घेतलेला आहे.

बायनाची सासू आऊ, आनंदी, नथूनानी, चंदर, भाना, कारकुन्या, लायाप्पा, हरिबा मान्या ही पात्रे बायनाला मदत करतात. त्यांचाही आढावा, घेतलेला आहे. तसेच शेवाळेकाका, जयसिंग, आबा, हत्तीबाळगौंड, धारीराव, बेळगांवकर, केसूमामा, बळीआबा, म्हारतीदादा, संपत, बाजीनाना यांची स्वभाव वैशिष्ट्येही सांगितलेली आहेत. संभाचा मामा म्हादू सदलगा, सुभान्या, लाटणेचा बाळूशा यांचाही आढावा घेतलेला आहे. बेलदार आणि बेलदाराची बायको, शाबी, आनंदी, हान्या, आबा, दत्तुआबा, त्याचा मित्र तुका सावंत, आबाची मुलगी शिर्मा, चंदर गाडीवान, आप्पासाहेब तलाठी इ. विवचन आले आहे. पुढे सगुणाचा जिव असलेला तायाप्पा मगर याचा नाममात्र उल्लेख आलेला आहे. शेळक्याची मुलगी, बब्या ही पात्रेही विवेचनात आलेली आहेत. पुजेला जाणारी वच्चीची स्वभाववैशिष्टे सांगितलेली आहेत.

एकंदरीत वरील सर्व गौणपात्रांचा विचार प्रस्तुत प्रकरणात केलेला आहे.

वरील मानवी व्यक्तिरेखाशिवाय मानवेत्तर प्राणी वा वस्तूंच्या व्यक्तिरेखाही पाटील रेखाटतात. त्यामध्ये कंदील, वारा, कोल्हा इ. विषयीही विवेचन केले आहे.

वातावरण निर्मिती विषयी विवेवनही या प्रकरणात केले आहे. त्यामध्ये 'ल्हावर' कथासंग्रहामधील विविध प्रकारची वातावरणनिर्मिती पाटलांनी केलेली आहे. त्यामध्ये अंधारलेले निराश मन व्यक्त करणारे वातावरण अस्वस्थ वातावरण, भयाकुल वातावरण, आकाशातील ढग व म्हैसीची कास यांची तुलना करणारे वातावरण, भक्तीला पुरक वातावरण, प्रेमातूर, कातर प्रीतीचे वातावरण, संमोहित करणारे वातावरण बायनाच्या शोधाचे वेळचे वातावरण, निसर्गरम्य वातावरण, तारुण्याला गरमपणा व्यक्त करणाारे वातावरण, विरोधी वातावरणातून भावदर्शन, दु:खद वातावरण, आनंदी वातावरण अशा वातावरणाचे उदाहरणासहीत विवेचन केले आहे.

यानंतर पाटलांच्या कथेमधील संवाद कसे आहेत याविषयी विवेचन केले आहे. त्यामध्ये प्रसंगनिष्ठ संवाद चटकदार संवाद, मनाची पकड घेणारे संवाद, मनाचे तळ शोधणारे, सहजसंवाद इ. विषयक संवादाचे विवेवन केले आहे.

नंतर ग्रामीण जीवनाचे सुक्ष्मनिरीक्षण याविषयी विवेचन केले आहे. त्यामध्ये प्राणीजीवनाचे सुक्ष्म निरीक्षण, मानवी वर्तनाचे सुक्ष्मनिरीक्षण, त्यातील हालचाली व्यक्तीविशेष, सवय, स्त्रीचे निरीक्षण, निसर्ग निरीक्षण, इ. चा आढवा घेतलेला आहे.

निसर्गचित्रण याविषयी विवेचन आलेले आहे.

प्रकरणाच्या शेवटी भाषाशैलीचा आढावा घेतलेला आहे. त्यामध्ये 'ल्हावर' कथासंग्रहाची भाषाशैलीची वैशिष्टे याविषयी विवेचन केलेले आहे. त्यामध्ये ग्रामीण भाषाशैली, ग्रामीण शब्दकला, वाक्यरचना, भाषेचे वर्णन सामर्थ्य, नादमाधुर्ययुक्त शब्दकला, निसर्गप्रतीमा संपन्न भाषा, पांगिरा, वाऱ्याचे शब्दचित्रे रेखाटणारा, निसर्ग सामर्थ्यसंपन्न भाषा, भाषेतील प्रादेशिक छटा इ. वैशिष्टयांचा उदाहरणासहित सविस्तर विचार केलेला आहे.

अशा विविध दृष्टिकोनातून या प्रकरणामध्ये विचार केलेला आहे. या कथासंग्रहाचा सविस्तर अभ्यास करताना आवश्यक तेथे संदर्भ घेतलेले आहेत. त्या संदर्भ ग्रंथाची यादी व कात्रणेही सोबत जोडलेली आहेत.

प्रकरण तीनमध्ये 'भोवरा' कथासंग्रहाविषयी विवेचन केलेल आहे. तसेच 'भोवरा' कथासंग्रहाचे विविध वैशिष्ठ्यांच्या माध्यमातून मुल्यमापन केले आहे.. त्यामध्ये ग्रामीण कथानक, प्रदेश, प्रदेश, प्रीती, कौटुंबिक प्रश्न, आर्थिक तणाव, ग्रामीण निसर्ग, ग्रामीण जीवनातील साह्ययक ग्रामीण जीवनचित्रण, ग्रामीण भाषा इ.विषयी विवेचन आले आहे.

नंतर मनोविश्लेषणणात्मक कथांचा आढावा घेतलेला आहे. त्यामध्ये उदाहरणासहित सविस्तर विवेचन केले आहे. त्यामध्ये लोकसमजुतीवर आधारित कथा, मनोविश्लेषणात्मक कथा, संघर्षकथा, अंधश्रद्धेवर आधारित कथा, विनोदी कथा विवाह कथा, सूडकथा, निसर्गवर्णनपर कथा इ. विषयक कथांचा आढावा घेतलेला आहे.

यानंतर स्वभावरेखाटनाचा विचार केलेला आहे. त्यामध्ये प्रीतीविश्वात रमणारी पात्रे चंदर, कोंडया आंदू इ. विषयी लिहिलेले आहे. सूडाने पेटलेल्या व्यक्तिरेखांच्यामध्ये चंदरचा आढावा घेतलेला आहे. शेतीजीवनाशी एकनिष्ठ व्यक्तिरेखेमध्ये दत्तू माळी, चंदर यांच्याविषयी विवेचन केले आहे.

कैचीत सापडलेला बाळासाब याचाही आढावा घेतलेला आहे. घाबरट व्यक्तिरेखामध्ये किसन याचाही उल्लेख केलेला आहे. विनोदी व्यक्तिरेखाटनामध्ये महादूचा उल्लेख केलेला आहे.

स्त्री व्यक्तिरेखांच्यामध्ये तमाशातील सगुणा, सुगंधा, बकुळा इ. स्त्रीयांचे स्वभावरेखाटन केलेले आहे.

नंतर गौणपात्रांचा आढावा घेतलेला आहे. त्यामध्ये सुभान्या आबा, सदावाणी कोऱ्या म्हार, ज्ञानू दलाल इ. पात्रे आलेली आहेत. तसेच चंदरला मदत करणारा रामा आहे. शेतावर जाणारा बाळू आहे. सापाला घाबरलेल्या किसनची बायको आहे. किसनची आई, माहेराहून घरी येणारी बकुळी, महिपा डवंग, चैनी करणारे हरिबा, कमाल, लालभाषा, सुभान्या, पांडा कदम, बाळासबचा मामा, चिवटा, शेवाळेकाका, भात काढणारे वशीकर दामा, भाऊसाब, सिद्राम इ. पात्राचे त्यांच्या स्वभाववैशिष्ट्यासह विवेचन केले आहे.

या गौण पात्रांच्या व्यतिरिक्त मानवेत्तर जीवनाच्या स्वभावरेखाटनाचाही आढावा घेतलेला आहे. त्यामध्ये साप, बैल याचा समावेश होतो.

पुढे कथेच्या विकासाबाबत विवेचन केलेले आहे. त्यामध्ये कथेचा आकर्षक प्रारंभ, औत्सुक्यपूर्ण विकास अनपेक्षित अखेर इ. विषयक विवेचन 'कैची', 'लुट', 'पाहुणा' इ. कथांच्या माध्यमातून केलेले आहे.

वातावरणनिर्मितीविषयी नंतर विवेचन आलेले आहे. त्यामध्ये आनंदी वातावरण अंधश्रद्धेचे वातावरण अस्वस्थ वातावरण, आतूर वातावरण, मनाचे गारठणे व्यक्त करणारे वातावरण, भीतीचे वातावरण, मनाचे गुढ उकलणारे वातावरण, मनोदर्शन घडविणारे वातावरण इ. वातावरणावर उदाहरणासहित चर्चा केलेली आहे.

नंतर संवादाविषयी विवेचन आलेले आहे. त्यामध्ये उल्लेखनीय संवाद, चटकदार संवाद, सहजसंवाद, मनाचे तळ शोधणारे संवाद, प्रसंगनिष्ठ संवाद, तिरकस संवाद इ. संवादाविषयी लिहिले आहे.

नंतर ग्रामीण जीवनाचे सुक्ष्मनिरीक्षण याविषही लिहिलेले आहे. त्यामध्ये मानवी वर्तनाचे सुक्ष्मनिरीक्षण, प्राण्यांचे निरीक्षण साप, स्त्रीनिरीक्षण, इ. विषयी लिहिले आहे.

निसर्ग निरीक्षण, निसर्गचित्रण याविषयी विवेचन आलेले आहे. 'भोवरा' कथासंग्रहामध्ये लोकसमजुती आलेल्या आहेत त्यांच्याविषयी विवेचनही केलेले आहे.

शेवटी भाषाशैली विषयी विवेचन आलेले आहे. त्यामध्ये अलंकारीक भाषाशैली, ग्रामीण भाषाशैली,ग्रामीण शब्दकला निसर्गसंपन्न भाषा, वाक्यप्रचारांचा वापर, भाषेतील विनोदीचे सामर्थ्य, स्त्रीवर्णन सामर्थ्य संपन्न भाषा, भाषेतील प्रादेशिक छटा, विशिष्ट वाक्यरचना इ. वैशिष्टयांचा विचार केलेला आहे. अशा विविध दृष्टिकोनातून अभ्यास करताना संदर्भाचाही वापर केलेला आहे. त्या संदर्भाची यादी सोबत जोडलेली आहे .

यावरुन असे दिसते की,

१) रंगराव पाटलांची कथाही सांगली कोल्हापूर या जिल्हातील विशिष्ट प्रदेशातील कथा आहे. या प्रदेशाला राष्ट्रीय महामार्गाचा स्पर्श केलेला आहे. खुद्द लेखकाचे गांव कामेरी, याला स्पर्श करुन हा महामार्ग जातो. कामेरीपासून ४० किलोमीटरवर कोल्हापूर आहे. सुमारे तितक्याच अंतरावर सांगली आहे. ३० ते ३२ किलोमीटरवर कराड शहर आहे. तीन किलोमीटरवर इस्लामपूर सारखे विकासान्मुख नगर आहे. या साऱ्याचा परिणाम या परिसरातील लोकजीवनावर झालेला आहे. आणि लेखकानेही तो न्याहाळलेला आहे. लेखकाच्या बहुतेक कथामधील कथानके घटनाप्रसंग व व्यक्तिमत्वे या कामेरी परिसरातील आहेत. प्रा. गंगाधर गाडगीळांच्या भाषेत बोलायचे झाले तर रंगराव पाटलांचे हे नंदनवन आहे.

हे नंदनवन बदलत असले तरी या बदलणाऱ्या जाणीवा रंगराव पाटलांच्या कथांना फारसा स्पर्श करीत नाहीत. या बदलापेक्षा एक स्वप्नवत असलेली जुनी संस्कृती जपणारे आणि नव्या सुधारणापासून अस्पर्शीत असणारे असे खेडेच लेखकाच्या मनात दिसते आणि त्या खेड्यातील सुख दु:खाशीच लेखक समरस झालेला दिसतो. यामुळे रंगराव बापूंच्या कथामध्ये सुधारणांची चाहूल लागल्यामुळे उलथापालथ झालेले नवे प्रश्न घेऊन जीवनाच्या समोरे जाणारे मोडतोड होत राहीलेले, जुन्या नव्यांच्या संघर्षात सापडलेले असे खेडे येत नाही. ही रंगराव पाटलांच्या कथांची एक सीमारेषा आहे.

अशी सीमारेषा असण्याचे कारण लेखकाच्या व्यक्तिमत्वातच सापडते. लेखकांनी जगण्याचा जो एक मार्ग स्वीकारलेला आहे. तो काहीसा चाकोरीबद्ध आणि नीट सरळ नाकासमोर चालणाऱ्या सरळ स्वभावी व्यक्तिमत्वाचा आहे. आणि आपल्या मनातील या सुसंस्कृत जीवनाला कसलाही धक्का लागू नये. कोणतेही संघर्षमय परिवर्तन त्यात येऊ नये असा समज जपणाऱ्यापैकी हे एक लेखक आहेत. त्यामुळे ते कोणत्याही तटागटात सहभागी होत नाहीत. कोणत्याही प्रकाशकाच्या मागे लागलेले दिसत नाहीत. आपल्याच कैफात निर्मिती करावी आणि त्या निर्मितीचा आनंद घ्यावा असा आत्मदंग हा लेखक आहे. आणि मग एखाद्या नियतकालीकाकडे कथा पाठवून बघावी झाली

प्रसिद्ध तर झाली नाही तरीही ठीक अशी जीवनपद्धती लेखकाने स्वीकारलेली आहे. आणि त्यामुळे त्यांच्या कथामधील जीवनदर्शनाला मर्यादा पडलेल्या आहेत. यांत्रिकी करणाच्या स्पर्श न झालेले आणि आपल्या पुरातन संस्कृतीमध्ये दंग असलेले खेडेच लेखकाच्या डोळ्यासमोर सदैव आहे. आणि त्याला अभिव्यक्त करण्याचा ते प्रयत्न करतात.

२) लेखकाच्या मनातील हे अनुभूती विश्व व्यक्त करत असताना रंगराव पाटलांनी एक विशिष्ट दृष्टिकोन स्वीकारलेला दिसतो आणि तो म्हणजे कथेतील संवाद आणि संवादा व्यतिरिक्त इतर निवेदन वा वर्णन यामध्ये त्यांनी एकच प्रकारची ग्रामीण भाषा वापरलेली आहे. ग्रामीण लेखन करणाऱ्या बहुतेक कथाकारांनी संवादासाठी ग्रामीण भाषाशैली आणि वर्णन निवेदनासाठी प्रमाणभूत मराठी असा वापर केलेला आहे. त्यामुळे त्यांच्या कथा ग्रामीण बोली न समजणारांना समजू शकतात आणि त्या कथांचा आस्वाद घेऊ शकतात परंतु हा मार्ग रंगराव पाटलांनी अनुसरला नाही. त्यामुळे त्यांची संपूर्ण कथा ग्रामीण बाजातच अवतीर्ण होते. यामुळेही त्यांच्या वाचकवर्गाला मर्यादा पडलेली असावी.

३) या मर्यादा गृहीत धरल्या नंतर सुद्धा जेव्हा आपण त्यांच्या कथांचा विचार करतो तेव्हा आपणास जाणवते की, लेखकाचे मनोविश्व असंख्य व्यक्ती नमुन्यांनी गजबजलेली आहे. त्यामध्ये अनेक प्रकारच्या व्यक्तिरेखा येतात. त्या भिन्नभिन्न स्वरुपाच्या आहेत म्हणून व्यक्तिरेखाटनाच्या दृष्टिकोनातून जेव्हा आपण रंगराव पाटलांच्या साहित्याचा विचार करतो तेव्हा प्रामुख्याने जाणवते की, या लेखकाचे मनुष्य जीवनाचे निरीक्षण अत्यंत व्यापक आणि सामर्थ्यशिल आहे. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, मिरासदार, आनंद यादव इ. ग्रामीण लेखकाच्या अनुभव विश्वाशी तुलना करता हे व्यक्ती रेखाटनाचे अनुभव निश्चितच संपन्न व समर्थ आहे. या दृष्टीने ग्रामीण कथेचा दर्जा रंगराव पाटलांनी निश्चितच उंचावलेला आहे.

४) व्यक्तिरेखाटणाच्या वैशिष्टयाबरोबरच त्या व्यक्तिच्या मनाचा तळ शोधणे हे काम ग्रामीण लेखकांनी केलेले आहे. आणि त्यासाठी अलिकडच्या ग्रामीण लेखकांनी मनोविश्लेषणाची खूपच मदत घेतलेली आहे. नव्या यांत्रिकी जीवनापासून काहीसे दूर राहणारे रंगराव पाटील इथे मात्र मनोविश्लेषणाचे स्वागत करताना दिसतात. त्यामुळे त्यांच्या कथामधल्या पात्रांच्या अंतरंगाचा वेध घेणे अत्यंत सहज सुलभ होते. अनेक व्यक्तिरेखांच्या मनाचे तळ लेखकांनी शोधलेले आहेत. आणि त्यांचे सौंदर्य शब्दांकींत केलेले आहे. काही कथा तर मनोविश्नेषणावर आधारीत आहेत. त्या म्हणजे 'दिंडी', 'जोगवा', 'सय', 'कैची', 'कंदील' इ. होत. म्हणून मनोविश्लेषण सामर्थ्याचा दृष्टिकोनातून त्यांची कथा आधिक दिमाखदार वाटते.

५) ग्रामीण कथेमध्ये निसर्ग हा महत्वपूर्ण ठरतो. कारण ग्रामीण तीवनच निसर्गावर असलंबून असते ते शेतीप्रधान असते म्हणूनच ऊन, वारा, पाऊस, थंडी या हवामानाच्या लहरीवर या जीवनाचे भावनीकरण खुलत असतात. कोमेजत असतात. याचे भान रंगराव पाटलांना आहे. आणि त्यांचे प्रत्यंतर 'ल्हावर', 'भोवरा' मधून येते. शेतीवर प्रेम करणारा शेतकरी, ती निरुपायाने विकावयाची वेळ येताच, अस्वस्थ झालेले त्याचे मन, त्याच्या वेदना, शेतीजनवनातील पशूपक्षी, वनस्पती, झाडेझुडपे, नदीनाले, विहीरी या साऱ्या जगाचे रंगराव पाटलांचे निरीक्षण इतके सुक्ष्म आहे की, त्यांच्या कथा वाचत असताना एखाद्या सप्तरंगी चित्रपट पहात असल्याचे जाणवते या बाबतीत ते इतर ख्यातकीर्ती लेखकांच्या तोडीचेच आहेत असे वाटते.

६) वातावरणनिर्मितीच्या बाबतीत रंगराव बापू पाटील हे समर्थ लेखक आहेत असे जाणवते. ते भीती, प्रीती, अस्वस्थ, आनंदी, दु:खद अशा कितीतरी प्रकारचे वातावरण निर्मिती करतात.

७) भाषाशैलीची वैशिष्टे सांगावयाची झाली तर प्रसंन्न शब्दकला, अलंकारीक भाषाशैली, नादमाधुर्य वर्णन सामर्थ्य संपन्नभाषा, ग्रामीण शब्दकला, निसर्गप्रतीमांचा वापर, शब्दचित्र संपन्न भाषा, इ. वैशिष्टे असल्याचे दिसतात.

अशा स्वरुपाच्या या घटकांमधून रंगराव बापूंची कथा साकारत जाते. ती साकारत असताना याही बाबतीत त्यांनी आपल्या कथांना एक मर्यादा घातल्याचे दिसते. ना. सी. फडके यांनी 'लघुकथालेखन तंत्र आणि मंत्र' हे तत्कालीन लेखकांच्या समोर ठेवलेले होते. रंगराव पाटलांच्या कथा वाचताना असे सातत्याने जाणवते की, हा फडकेप्रणीत साचा समोर ठेवून त्यांनी आपल्या कथा फुलवलेल्या आहेत. अत्यंत औत्सुक्यपूर्ण चटकदार असा प्रारंभ करावयाचा आणि काही घटनां प्रसंगातून वा संवादातून सूचकता निर्माण करुन वाचकांच्या मनातील औत्सुक्य वाढीस लावावयाचे आणि वाचकाला खेळवीत अनपेक्षीत पण मनावर परिणाम करणारी अखेर करावयाची. बहुतेक कथा याच पद्धतीने फुललेल्या आहेत. त्यामुळे मनोविश्लेषणासारखाा नवकथेतला घटक येऊनही रंगराव बापूंची कथा नवकथा झाली नाही. ती ग्रार्मीण लघुकथा झाली ही एका परीने त्यांच्या कथेची मर्यादा आहे.

अशाप्रकारच्या गुणदोषांनी युक्त अशीही रंगराव बापूंची कथा आहे. ती निश्चितच अनेक दृष्टींनी दर्जेदार आहे. या दर्जेदारपणामुळेच अनेक समीक्षकांनी तिची दखल घेतली आहे. प्रा. मुलाटे यांनी आपल्या प्रबंधात रंगराव बापूंच्या कथांचा सर्वांगिण विचार केलेला आहे. आणि मराठी ग्रामीण कथेमध्ये रंगराव बापूचे स्थान किती महत्वाचे आहे हे समजावून सांगितलेले आहे. आपल्या नंदनवनात रमणाऱ्या कोणत्याही प्रकाशकाच्या वा समीक्षकाच्या दाराशी न जाणाऱ्या लेखकाच्या कथावर झालेली ही समीक्षा त्यांना मिळालेले राज्यपुरस्कार आणि त्यांच्या कथांचे अनेक पुरस्कार हेच इतके बोलके आहेत की. मराठी ग्रामीण कथेचा इतिहास रंगराव बापूंच्या कथाशिवाय पूर्ण होऊ शकणार नाही असे दिसते आणि हेच त्यांचे सामर्थ्य आहे.